दैनिक
# तेरणा वृत्तांत

धाराशिव • पृष्ठे : ४ • अंक : २१ • किंमत : ₹ ५ • वर्ष : १ गुरुवार, १० सप्टेंबर २०२६ RNI NO. MHMAR/25/A0338 • epaper.ternavruttant.com

## धाराशिवच्या स्वच्छतेला मिळणार 'जेटिंग'ची गती

### मैला उपसा, सांडपाणी वाहिन्या व गटारांच्या स्वच्छतेसाठी अत्याधुनिक वाहन दाखल



**धाराशिव : शहरातील स्वच्छता व्यवस्था अधिक सक्षम आणि गतिमान करण्याच्या दृष्टीने धाराशिव नगरपरिषदेच्या ताफ्यात अत्याधुनिक जेटिंग मशीन (मैला उपसा वाहन) दाखल झाले आहे. स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) २.० अंतर्गत हे वाहन नगर परिषद कार्यालयात आणण्यात आले आहे.**

'या वाहनाच्या माध्यमातून शहरातील सांडपाणी वाहिन्यांची स्वच्छता, गटारांची देखभाल तसेच मैला उपसा यासारखी कामे अधिक जलद आणि प्रभावीपणे करता येणार आहेत. अत्याधुनिक यंत्रसामग्रीमुळे स्वच्छता कर्मचाऱ्यांना प्रत्यक्ष गटारात नाल्यात उतरून स्वच्छता करावी लागणार नाही. त्यामुळे कामकाज अधिक सुरक्षित पद्धतीने करता येईल', अशी माहिती नगराध्यक्षा नेहा राहुल काकडे यांनी दिली आहे.

शहरातील स्वच्छता व्यवस्थेवरील वाढता ताण लक्षात घेता जेटिंग मशीनमुळे नाल्या, सांडपाणी वाहिन्या आणि मैला उपशाच्या कामांना गती मिळण्याची अपेक्षा आहे. नागरिकांना अधिक दर्जेदार स्वच्छता सेवा उपलब्ध करून देण्यासाठी नगर परिषदेकडून हे महत्त्वाचे पाऊल उचलण्यात आले आहे. स्वच्छ, सुंदर आणि आधुनिक धाराशिवच्या दिशेने नगर परिषदेचा हा महत्त्वपूर्ण उपक्रम मानला जात आहे.

## एमपीएससीचे स्वप्न अधुरे

### धाराशिव जिल्ह्यातील तरुणाची पुण्यात आत्महत्या

### २५ वर्षीय प्रथमेश देशमुखच्या मृत्यूने हळहळ

**पुणे :** स्पर्धा परीक्षेत यश मिळवून अधिकारी होण्याचे स्वप्न उराशी बाळगून पुण्यात एमपीएससीची तयारी करणाऱ्या खासापुरी (ता. परांडा) येथील प्रथमेश दिलीप देशमुख (वय २५) या तरुणाने आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. आर्थिक अडचणी आणि वाढत्या कर्जामुळे तो गेल्या काही दिवसांपासून तणावात असल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. या घटनेमुळे खासापुरीसह धाराशिव जिल्ह्यात हळहळ व्यक्त होत आहे.



प्रथमेश हा मूळचा खासापुरी येथील रहिवासी होता. प्रथमेशच्या वडिलांचे काही वर्षापूर्वी निधन झाले असून त्याच्या कुटुंबात आई आणि चार बहिणी असल्याची माहिती समोर येत आहे. अधिकारी होण्याच्या ध्येयाने तो पुण्यात राहून महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) परीक्षेची तयारी करत होता. मात्र पुण्यातील राहण्याचा व दैनंदिन गरजांचा खर्च भागवताना त्याच्यासमोर आर्थिक अडचणी निर्माण झाल्या होत्या. त्याने ओळखीच्या काही व्यक्तींकडून पैसे घेतल्याची आणि त्याच्यावर जवळपास अडीच लाख रुपयांचे देणे असल्याची माहिती समोर आली आहे. खोलीचे भाडेही थकल्याने आर्थिक कोंडी आणखी वाढल्याचे सांगण्यात येत आहे.

या परिस्थितीमुळे प्रथमेशने स्पर्धा परीक्षेची तयारी थांबवून गावी परतण्याचा विचारही परिचितांजवळ व्यक्त केला होता. दरम्यान, पुण्यातील नारायण पेठ परिसरात त्याने गळफास घेऊन आत्महत्या केल्याचे समोर आले. आत्महत्येपूर्वी त्याने लिहिलेली चिठ्ठी पोलिसांच्या हाती लागली असून, त्यामध्ये आर्थिक परिस्थिती तसेच पैशांच्या व्यवहारांचा उल्लेख असल्याची माहिती आहे. या चिठ्ठीच्या आधारे पोलिसांकडून प्रकरणाचा पुढील तपास सुरू आहे.

## धाराशिव जिल्ह्यात कोरडा दुष्काळ जाहीर करा; आमदार तानाजी सावंत यांची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

**परंडा :** धाराशिव जिल्ह्यात या वर्षी अपेक्षित पाऊस न झाल्याने अनेक भागांत पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून, शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे. पिण्याचे पाणी, जनावरांचा चारा आणि ग्रामीण रोजगाराचा प्रश्नही दिवसेंदिवस गंभीर होत आहे. या पार्श्वभूमीवर शासनाने धाराशिव जिल्ह्यात तातडीने दुष्काळ जाहीर करावा, अशी मागणी



माजी मंत्री आणि आमदार प्रा. डॉ. तानाजी सावंत यांनी केली आहे. सावंत यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र लिहून ही विनंती केली आहे.

सरकारने शेतकऱ्यांना पीक नुकसानभरपाई, दुष्काळी अनुदान, वीजबिलात सवलत, पिण्याच्या पाण्याची व चाऱ्याची व्यवस्था तसेच रोजगार हमीची कामे मोठ्या प्रमाणात सुरू करावीत, अशी मागणी या पत्रात करण्यात आली आहे.

राज्यातले महायुतीचे सरकार शेतकरी आणि ग्रामीण जनतेला या संकटातून बाहेर काढण्यासाठी तातडीने सकारात्मक निर्णय घेईल अशी अपेक्षा सावंत यांनी व्यक्त केली आहे.

## गणेशोत्सवाला कोकणात जाणाऱ्या धाराशिवकरांसाठी खूशखबर

**लातूर :** तुम्ही धाराशिवमध्ये राहता आणि गणेशोत्सवासाठी कोकणात जाण्याचे नियोजन करत असाल तर ही बातमी वाचून तुम्ही आनंदी व्हाल. कोकणात जाण्यासाठी तुम्हाला थेट रेल्वे मिळणार आहे, ती पण येडशी किंवा बार्शीतून. आता कुर्डूवाडी, लातूरला जायची गरज नाही. रेल्वे विभागाने मराठवाड्यातील नागरिकांची अनेक दिवसांची मागणी पूर्ण झाली असून नांदेड-लातूर-धाराशिव मार्गे कोकणासाठी गणपती विशेष रेल्वे गाडीला मंजुरी दिली आहे. लातूरचे खासदार शिवाजीराव काळगे यांनी यासाठी दक्षिण मध्य रेल्वेसह मध्य रेल्वे आणि कोकण रेल्वेच्या महाव्यवस्थापकांकडे सातत्याने पाठपुरावा केला होता.

त्यांच्या या पाठपुराव्याला अखेर यश आले असून, ही विशेष गाडी नांदेड ते सावंतवाडी रोड रेल्वे स्थानकापर्यंत धावणार आहे. या विशेष रेल्वेमुळे लातूर, धाराशिवसह मराठवाड्यातील गणेशभक्तांना चिपळूण, रत्नागिरी, सावंतवाडी रोड आदी कोकणातील ठिकाणी जाणे सुलभ होणार आहे. तसेच लातूरहून पहाटे पुणे व पनवेलकडे जाण्यासाठी आणि पुण्याहून रात्री लातूरला परतण्यासाठीही प्रवाशांना सुविधा उपलब्ध होणार आहे. या रेल्वेचे वेळापत्रक प्रवासी आयआरसीटीसीच्या वेबसाईटवर जाऊन समजून घेऊ शकतात व त्यांच्या गरजेनुसार तिकीट आरक्षित करू शकतात, असे रेल्वेच्या वतीने सांगण्यात आले आहे.




### धाराशिवकरांसाठी येडशी, बार्शीला थांबा

नांदेड-सावंतवाडी रोड ०७६५९-०७६६० ही विशेष रेल्वे १०, ११, १२,१३,१८,१९,२० सप्टेंबर २०२६ यादिवशी धावणार असून, या रेल्वेचे आरक्षण प्रवासी करू शकतात. ही रेल्वे पहाटे ०५ वाजून ०५ मिनिटांनी येडशीत, तर पहाटे ०६ वाजून १८ मिनिटांनी बार्शी रेल्वे स्थानकात येणार आहे. धाराशिवकर या दोन स्थानकांवरून रेल्वेत बसू शकतात. लातूर किंवा कुर्डूवाडीला जाऊन रेल्वे पकडण्याची गरज धाराशिवकरांना पडणार नाही.

## 'श्रीगणेशा आरोग्याचा' उपक्रमातून राज्यभर भक्तांची मोफत आरोग्य तपासणी

मुंबई : श्रीगणेशोत्सवात भक्तांच्या आरोग्याची काळजी घेत मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाच्या पुढाकाराने राज्यभर सुमारे २० हजार मोफत आरोग्य तपासणी शिबिरे आयोजित करण्यात येणार आहेत. सार्वजनिक गणेश मंडळांच्या मंडपांपासून महानगरपालिका, नगरपालिका, नगरपंचायत तसेच ग्रामीण भागापर्यंत ही सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून सुरू झालेल्या 'श्रीगणेशा आरोग्याचा' उपक्रमाचे हे दुसरे वर्ष आहे. मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाच्या पुढाकाराने सार्वजनिक आरोग्य विभाग सुमारे १० हजार सार्वजनिक गणेश मंडळे, शासकीय व निमशासकीय यंत्रणा, सामाजिक संस्था आणि दात्यांच्या सहभागातून हा उपक्रम राबविण्यात येत आहे. यंदा राज्यातील सर्व ३६ जिल्ह्यांत उपक्रमाची व्याप्ती वाढविण्यात आली असून नागरिकांना त्यांच्या परिसरातच मोफत आरोग्य तपासणीची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

**डॉक्टर आपल्या दारी:** या उपक्रमात नागरिकांना त्यांच्या परिसरात आरोग्य तपासणीची सुविधा मिळावी आणि आजारांचे वेळेत निदान व्हावे, हा या उपक्रमाचा उद्देश आहे. तपासणी दरम्यान आरोग्यविषयक समस्या आढळल्यास संबंधितांना पुढील तपासणी व उपचारासाठी संदर्भित करण्यात येणार आहे. या उपक्रमाच्या अंमलबजावणीसाठी शासकीय वैद्यकीय महाविद्यालये, जिल्हा रुग्णालये, शहरी आरोग्य आयुक्तालय, स्थानिक स्वराज्य संस्थांची आरोग्य यंत्रणा तसेच धर्मादाय रुग्णालयांतील डॉक्टर व आरोग्य कर्मचाऱ्यांची मदत घेण्यात येणार आहे. तपासणीनंतर पुढील उपचारांची आवश्यकता असलेल्या पात्र रुग्णांना महात्मा फुले जन आरोग्य योजना तसेच इतर संबंधित शासकीय योजनांच्या माध्यमातून उपचाराचा लाभ मिळवून देण्यात येणार आहे.

गेल्यावर्षी दि. २८ ऑगस्ट ते ६ सप्टेंबरदरम्यान आयोजित १२ हजार ६५५ आरोग्य शिबिरांमध्ये ७ लाख ४ हजार ७३ नागरिकांची मोफत आरोग्य तपासणी करण्यात आली होती. त्यापैकी १८ हजार ८०० रुग्णांना पुढील उपचारासाठी संदर्भित करण्यात आले होते. तसेच २३६ रक्तदान शिबिरांमध्ये १६ हजार ७९८ नागरिकांनी रक्तदान केले होते. या प्रतिसादाच्या पार्श्वभूमीवर यंदा उपक्रमाची व्याप्ती वाढविण्यात आली आहे.

**या आजारांचा असणार समावेश:** हृदयरोग, किडनीविकार, कर्करोग, मधुमेह, संसर्गजन्य आजार, मेंदूचे गंभीर आजार, बालरोग यांसह विविध आजारांची प्राथमिक तपासणी करण्यात येणार आहे. गरजेनुसार पुढील तपासणी व उपचारासाठी रुग्णांना तज्ज्ञ डॉक्टर तसेच संबंधित रुग्णालयांकडे संदर्भित करण्यात येणार आहे.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून सुरू झालेला 'श्रीगणेशा आरोग्याचा' उपक्रम यंदा अधिक व्यापक स्वरूपात राबविण्यात येत आहे. नागरिकांना त्यांच्या परिसरातच मोफत आरोग्य तपासणीची सुविधा मिळणार आहे. आजारांचे वेळेत निदान होऊन गरज असलेल्या रुग्णांना पुढील उपचारासाठी योग्य ठिकाणी संदर्भित करण्यात येणार आहे. यंदा २० लाखांहून अधिक नागरिकांच्या आरोग्य तपासणीचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. नागरिकांनी या उपक्रमाचा मोठ्या संख्येने लाभ घ्यावा, असे आवाहन मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष प्रमुख रामेश्वर नाईक यांनी केले आहे.

**'श्रीगणेशा आरोग्याचा' - २०२६:** यंदा २० हजार आरोग्य शिबिरे; २० लाखांहून अधिक नागरिकांच्या तपासणीचे उद्दिष्ट : सर्व ३६ जिल्ह्यांत उपक्रमाची अंमलबजावणी, सुमारे १० हजार सार्वजनिक गणेश मंडळांचा सहभाग

## तेरमध्ये अर्चनाताईंच्या हस्ते एक कोटींच्या विकासकामांचे भूमिपूजन

**तेर - 'आम्ही धाराशिव जिल्ह्याच्या विकासासाठी कटिबद्ध आहोत आणि वेळोवेळी विविध विकासकामांसाठी निधी उपलब्ध करूनही देत आहोत. तेरमधील विविध सुधारणा, रस्ते अशा एक कोटीरुपये किमतीच्या विकासकामांचे भूमिपूजन करताना मला आनंद वाटतो,' अशा भावना धाराशिव जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा अर्चनाताई पाटील यांनी व्यक्त केल्या. तेरमधील विविध विकासकामांचे भूमिपूजन त्यांच्या हस्ते झाले त्यावेळी झालेल्या कार्यक्रमात त्या बोलत होत्या.**

तेर येथे दलित वस्ती सुधार योजना, जनसुविधा व नागरी सुविधा या योजनांतर्गत मंजूर करण्यात आलेल्या एक कोटी रुपयांच्या निधीतून माळी प्लॉटिंग, दलित वस्ती तसेच गोदावरी परिसरातील सिमेंट काँक्रिटचे रस्ते तयार करणे त्याचबरोबर नालीचे बांधकाम करणे, या कामांचे भूमिपूजन या वेळी करण्यात आले.

त्या म्हणाल्या, 'आम्ही तेरच्या सर्वांगीण विकासासाठी या पुढेही आवश्यक तो निधी उपलब्ध करून देणार आहोत. शहराच्या इतर भागांतील विकासकामेही लवकरच पूर्ण करण्यात येणार आहेत.'

या वेळी सरपंच दीदीताई काळे, उपसरपंच श्रीमंत फंड, ग्रामविकास अधिकारी राठोड, नवनाथ नाईकवाडी, विठ्ठल लामतुरे, स्नप्निल नाईकवाडी, राहुल गायकवाड, गोरख माळी, नरहरी बडवे, सुनील गायकवाड, अतुल इंगळे, हनुमंत कोळपे, गणेश फंड, बाळासाहेब सौदागर, नानासाहेब पवार, प्रतीक नाईकवाडी, किशोर काळे, उषा सजे, मुमताज तांबोळी, जोशीला लोमटे व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# मराठवाड्यात ३ लाख १६ हजारांहून अधिक कुणबी प्रमाणपत्रांचे वाटप

## जात पडताळणीची १६ हजारांहून अधिक प्रकरणे निकाली; ५७ लाख नोंदी जनतेसाठी संकेतस्थळावर उपलब्ध

**छत्रपती संभाजीनगर : मराठवाड्यात कुणबी, मराठा-कुणबी व कुणबी-मराठा प्रमाणपत्रांच्या प्रक्रियेला गती देण्यासाठी शासनाकडून सातत्याने कार्यवाही करण्यात येत असून, आतापर्यंत प्राप्त झालेल्या ३ लाख १७ हजार ५६९ अर्जांपैकी ३ लाख १६ हजार ९७७ नागरिकांना कुणबी प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले आहे. तसेच जात पडताळणीसाठी प्राप्त २१ हजार ५१ अर्जांपैकी १६ हजार ११० प्रकरणांमध्ये जात पडताळणी प्रमाणपत्रे देण्यात आली आहेत.**

शासनाची कार्यवाही पारदर्शक असून, मराठा समाजाला कायदेशीर व टिकणारे आरक्षण देण्याची शासनाची सकारात्मक भूमिका असल्याची माहिती मराठी भाषा व उद्योगमंत्री डॉ. उदय सामंत यांनी स्मार्ट सिटी कार्यालयात पत्रकारांशी संवाद साधताना दिली. यावेळी आमदार प्रसाद लाड उपस्थित होते.

शिंदे समिती स्थापन झाल्यानंतर मराठवाड्यात करण्यात आलेल्या कार्यवाहीची माहिती देताना मंत्री डॉ. सामंत म्हणाले की, छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, बीड, लातूर आणि धाराशिव या आठ जिल्ह्यांमध्ये कुणबी प्रमाणपत्राच्या प्रक्रियेला गती देण्यात आली आहे. एकूण ३,१७,५६९ अर्ज प्राप्त झाले असून त्यापैकी ३,१६,९७७ प्रमाणपत्रे वितरित करण्यात आली आहेत. याशिवाय २,९५,३०५ प्रमाणपत्रे १० टक्के आरक्षणाच्या अनुषंगाने देण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

जात पडताळणी प्रक्रियेबाबत माहिती देताना मंत्री डॉ. सामंत यांनी सांगितले की, मराठवाड्यात २१,०५१ अर्ज प्राप्त झाले होते. त्यापैकी १६,११० प्रकरणे निकाली काढून प्रमाणपत्रे देण्यात आली आहेत. या प्रक्रियेत केवळ ६४ प्रकरणे नामंजूर झाली असून, ही



संख्या एकूण अर्जांच्या तुलनेत सुमारे ०.३ टक्के आहे. उर्वरित प्रकरणांवरही नियमानुसार कार्यवाही सुरू असून, नागरिकांना आवश्यक त्या प्रमाणपत्रांची पूर्तता करून देण्यासाठी प्रशासनाला निर्देश देण्यात आले आहेत.

शासनाने उपलब्ध करून दिलेल्या जुन्या अभिलेखांच्या माध्यमातूनही नागरिकांना मोठ्या प्रमाणात सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. आतापर्यंत शोधण्यात आलेल्या ५७ लाख नोंदी जनतेला पाहता याव्यात यासाठी उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. ग्रामपंचायत स्तरापर्यंत ही माहिती पोहोचविण्यासाठी तसेच नागरिकांना आवश्यक माहिती सहज उपलब्ध व्हावी यासाठी १० ते १७ सप्टेंबरदरम्यान विशेष शिबिरांचे आयोजन करण्यात येणार आहे.

न्यायमूर्ती शिंदे समितीचा मराठवाडा दौरा ७ सप्टेंबरपासून सुरू झाला असून, या अनुषंगाने विभागातील प्रशासनाशी समन्वय साधून कार्यवाहीचा आढावा घेण्यात येत आहे. आजच्या बैठकीत उपविभागीय अधिकारी, जिल्हाधिकारी तसेच जात पडताळणी समितीचे प्रमुख अधिकारी सहभागी झाले होते. स्थानिक पातळीवरील कार्यवाही अधिक प्रभावीपणे राबविण्यासाठी वरिष्ठ अधिकारी आणि जिल्हा प्रशासन यांच्यात समन्वय साधण्यात आला.

हैदराबाद गॅझेटियरच्या अनुषंगाने प्रमाणपत्र देण्याची कार्यवाही सुरू करण्यात आली असून, यासंदर्भातील अर्जांबाबत महाधिवक्त्यांचे कायदेशीर मत घेण्यात येणार आहे. तसेच सातारा आणि कोल्हापूर गॅझेटियर लागू करण्याबाबत शासनाने सकारात्मक भूमिका घेतली असल्याचे मंत्री डॉ. सामंत यांनी स्पष्ट केले.

मराठा समाजाला न्याय देताना संविधानिक व न्यायिक चौकटीत राहून आवश्यक ती कार्यवाही करण्यासाठी शासन पूर्णपणे सकारात्मक आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या नेतृत्वाखालील शासन मराठा समाजाला कायदेशीर आणि टिकणारे आरक्षण मिळवून देण्यासाठी कटिबद्ध आहे. त्याचवेळी इतर मागासवर्गीय समाजाच्या आरक्षणाला किंवा त्यांच्या हक्कांना कोणताही धक्का लागू नये, याचीही शासनाकडून पूर्ण दक्षता घेतली जात असल्याचे मंत्री डॉ. सामंत यांनी सांगितले.

प्रशासकीय यंत्रणेकडून सुरू असलेली कार्यवाही, उपलब्ध करून देण्यात आलेल्या नोंदी, प्रमाणपत्रांचे वाटप आणि जात पडताळणीची प्रकरणे याबाबतची माहिती संबंधित घटकांपर्यंत पोहोचविण्यात येत आहे. शासनाची ही कार्यवाही अधिक गतिमान, पारदर्शक आणि लोकाभिमुख करण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना सातत्याने करण्यात येत असल्याचेही मंत्री डॉ. सामंत यांनी स्पष्ट केले.

# धाराशिव जिल्ह्यात भीषण टंचाई, तातडीने शासकीय चारा छावण्या सुरू करा

### शिवसेना माजी तालुका प्रमुख अमोल जाधव यांची पालकमंत्र्यांकडे निवेदनाद्वारे मागणी

**तुळजापूर :** चालू हंगामात धाराशिव जिल्ह्यात पावसाचे प्रमाण अत्यंत अल्प राहिल्याने संपूर्ण जिल्ह्यात गंभीर दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली आहे. खरीप पिके हातातून गेली असून रब्बी हंगामही वाया गेला आहे. त्यामुळे जिल्ह्यातील पशूधन वाचवण्यासाठी तालुकानिहाय व मंडळ स्तरावर तात्काळ शासकीय चारा छावण्या सुरू कराव्यात, अशी मागणी शिवसेना तुळजापूर माजी तालुका प्रमुख अमोल शिवाजीराव जाधव यांनी जिल्ह्याचे पालकमंत्री प्रतापराव सरनाईक यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

पालकमंत्री प्रतापराव सरनाईक यांना दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, भूजल पातळी घटल्याने पिण्याच्या पाण्यासोबतच जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न अत्यंत गंभीर बनला आहे. बाजारात चाऱ्याचे दर गगनाला भिडल्याने सर्वसामान्य शेतकरी व पशुपालक हैराण झाले आहेत. चारा टंचाईमुळे शेतकऱ्यांना आपली दुभती




व शेतीची जनावरे कवडीमोल भावाने विकावी लागत आहेत. पशूधन वाचले नाही तर ग्रामीण अर्थव्यवस्था पूर्णपणे उद्ध्वस्त होईल, अशी भीती व्यक्त करण्यात आली आहे.

**प्रमुख मागण्या:**

जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थितीची गंभीर दखल घेऊन प्रत्येक तालुका व मंडळ स्तरावर तातडीने शासकीय मंजुरीने चारा छावण्या सुरू करण्याचे आदेश प्रशासनाला द्यावेत. चारा छावण्या सुरू होईपर्यंत गावोगावी अनुदानित तत्त्वावर चारा डेपो सुरू करून पशूखाद्य उपलब्ध करून द्यावे. जनावरांच्या छावण्यांमध्ये शुद्ध पिण्याचे पाणी, आरोग्य तपासणी आणि सावलीची पुरेशी व्यवस्था करण्यात यावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. शेतकरी आणि पशुपालकांच्या या जीवन-मरणाच्या प्रश्नावर पालकमंत्र्यांनी तात्काळ सकारात्मक निर्णय घेऊन पशूधनाचे रक्षण करावे, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.


# सोयाबीन करपले, बळीराजा संकटात; धाराशिवला दुष्काळ जाहीर करा!

### नगरसेवक मधुकर शेळके यांची मागणी

**तुळजापूर :** पावसाने तब्बल ४० दिवसांची दडी मारल्याने धाराशिव जिल्ह्यातील खरीप हंगाम संकटाच्या छायेत आला आहे. विशेषतः सोयाबीन पिकाला मोठा फटका बसला असून, उत्पादनाच्या आशेने उभे केलेले पीक आता शेतकऱ्यांच्या डोळ्यांसमोर धोक्यात आले आहे. त्यामुळे धाराशिव जिल्हा तातडीने दुष्काळग्रस्त जाहीर करून शेतकऱ्यांना सरसकट आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी जिजामाता प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष तथा भाजपचे नगरसेवक मधुकर शेळके यांनी केली.

ते म्हणाले, 'पावसाच्या प्रदीर्घ खंडामुळे शेतातील पिकांची अवस्था गंभीर झाली आहे. सोयाबीनसह अन्य खरीप पिकांवरही त्याचा परिणाम झाला असून, शेतीसाठी केलेला खर्च वाया जाण्याची भीती शेतकऱ्यांना सतावत आहे. अशा परिस्थितीत शासनाने कागदी प्रक्रिया आणि विलंब न करता तातडीने मदतीचा निर्णय घ्यावा.'

'मी स्वतःच्या शेतासह विविध भागांतील शेतशिवारात जाऊन पिकांची पाहणी केली. अनेक शेतकऱ्यांशी प्रत्यक्ष संवाद साधून त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या. पावसाअभावी सोयाबीनचे मोठे नुकसान होण्याची



**'आश्वासन नको, थेट मदत द्या'**

शेतकऱ्यांच्या प्रश्नावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्राताई अजित पवार यांनी तातडीने मंत्रिमंडळ बैठक बोलवून आर्थिक मदतीचा निर्णय घ्यावा, अशी मागणी शेळके यांनी केली. बैलपोळ्याच्या दिवशी बळीराजा सर्जा-राजाची पूजा करतो; मात्र यंदा त्याच बळीराजाच्या डोक्यावर आर्थिक संकटाचे सावट आहे. 'सोयाबीन हातचे गेले आहे. आता आश्वासनांची नव्हे, तर प्रत्यक्ष मदतीची गरज आहे. शासनाने वेळ न दवडता निर्णय घ्यावा,' असे शेळके यांनी स्पष्ट केले.

परिस्थिती निर्माण झाल्याचे शेतकऱ्यांनी सांगितले,' अशी माहिती शेळके यांनी दिली.

# गटई कामगारांच्या हाताला हक्काचा आधार सात लाभार्थ्यांना स्टॉलचे वाटप

### ऊन-वारा-पावसापासून मिळणार संरक्षण, व्यवसायासाठी पाच हजारांचे अनुदानही थेट खात्यात

**धाराशिव :** रस्त्याच्या कडेला किंवा मोकळ्या जागेत बसून ऊन, वारा आणि पावसाची तमा न बाळगता आपला छोटासा व्यवसाय करणाऱ्या गटई कामगारांना आता हक्काच्या स्टॉलचा आधार मिळाला आहे. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या योजनेअंतर्गत जिल्ह्यातील सात गटई कामगारांना मंगळवारी ८ सप्टेंबर रोजी पत्र्याच्या स्टॉलचे वाटप करण्यात आले. या स्टॉलमुळे प्रतिकूल हवामानापासून संरक्षण मिळण्याबरोबरच या कष्टकरी कामगारांना आपला व्यवसाय अधिक सुरक्षित आणि सन्मानाने करता येणार आहे.

गटई कामगारांना दि. १३ फेब्रुवारी २००८ च्या शासन निर्णयानुसार ऊन, वारा व पावसापासून संरक्षण मिळावे तसेच त्यांची आर्थिक उन्नती व्हावी, या उद्देशाने सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत ही योजना राबविण्यात येते. ग्रामपंचायत आणि नगरपालिका क्षेत्रातील गटई कामगारांना या योजनेतून १०० टक्के शासकीय अनुदानावर पत्र्याचे स्टॉल उपलब्ध करून दिले जातात. याशिवाय लाभार्थ्यांना व्यवसायासाठी आवश्यक साहित्य खरेदी करता यावे, यासाठी प्रत्येकी ५ हजार रुपयांचे अनुदान थेट लाभ हस्तांतरण (DBT) पद्धतीने देण्यात येते.



सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात प्राप्त तरतुदीतून जिल्ह्यातील सात लाभार्थ्यांची या योजनेसाठी निवड करण्यात आली. सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण,धाराशिव यांच्या कार्यालय परिसरात दि.८ सप्टेंबर २०२६ रोजी आयोजित कार्यक्रमात जिल्हा परिषद समाज कल्याण समिती सभापती विश्वास कोकणे आणि समाज कल्याण विभागाचे सहाय्यक आयुक्त सचिन कवले यांच्या हस्ते लाभार्थ्यांना गटई स्टॉलचे वाटप करण्यात आले. यावेळी समाज कल्याण अधिकारी सनम लामकाने तसेच समाज कल्याण विभागातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

स्टॉल योजनेअंतर्गत मंगेश नामदेव साबळे (रा.पळसप, ता.जि. धाराशिव), वैभव दत्तात्रय बनसोडे (रा.तेर, ता.जि. धाराशिव), बालाजी सदाशिव शेरखाने (रा.रुईभर, ता.जि.धाराशिव), ज्ञानेश्वर गोपाळ माने (रा.पोहनेर, ता.जि.धाराशिव), बब्रुवान व्यंकट हाकरे (रा.सांजा,ता. जि.धाराशिव), पांडुरंग जीवन शेरखाने (रा.चिलवडी, ता.जि.धाराशिव) आणि दत्तात्रय नानासाहेब राजगुरू (रा.बावी, ता.जि.धाराशिव) या सात लाभार्थ्यांना गटई स्टॉलचे वाटप करण्यात आले.

रोजच्या कष्टावर संसाराचा गाडा हाकणाऱ्या गटई कामगारांसाठी हा स्टॉल केवळ चार पत्र्यांचा निवारा नसून स्वतःच्या व्यवसायासाठी हक्काची जागा, हवामानापासून संरक्षण आणि आर्थिक स्वावलंबनाकडे टाकलेले एक पाऊल ठरणार आहे. शासकीय अनुदानातून मिळालेला स्टॉल आणि साहित्य खरेदीसाठी मिळणारी पाच हजार रुपयांची मदत या कामगारांच्या छोट्या व्यवसायाला बळ देऊन त्यांच्या आर्थिक उन्नतीस हातभार लावणार आहे.

# तेरणा अभियांत्रिकीत जीपॅट-नायपर परीक्षेसाठी तेरणाच्या विद्यार्थ्यांना यशाचा मंत्र

## अकॅडमी ऑफ फार्मसी ॲस्पायरंट्सचे संस्थापक औदुंबर शिंदे यांचे मार्गदर्शन

**धाराशिव : बी. फार्मसीनंतर उच्च शिक्षणासाठी महत्त्वाच्या असलेल्या जीपॅट आणि नायपर या राष्ट्रीय स्तरावरील प्रवेश परीक्षांमध्ये विद्यार्थ्यांनी यश मिळवावे, यासाठी तेरणा पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट्स कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, धाराशिव येथील फार्मसी विभागाच्या वतीने विशेष मार्गदर्शन व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. या मार्गदर्शन सत्राचा ९६ विद्यार्थ्यांनी लाभ घेतला.**

महाविद्यालयातील विद्यार्थी दरवर्षी चांगल्या संख्येने जीपॅट व नायपर परीक्षा उत्तीर्ण होत असून, यशाची ही परंपरा कायम ठेवण्यासाठी फार्मसी विभागाकडून सातत्याने विविध उपक्रम राबविण्यात येतात. त्याचाच एक भाग म्हणून ९ सप्टेंबर रोजी बी. फार्मसीच्या विद्यार्थ्यांसाठी हे विशेष मार्गदर्शन सत्र आयोजित करण्यात आले होते.

ॲकॅडमी ऑफ फार्मसी ॲस्पायरंट्सचे संस्थापक औदुंबर शिंदे यांनी प्रमुख मार्गदर्शक म्हणून विद्यार्थ्यांशी संवाद साधला. त्यांनी जीपॅट व नायपर परीक्षेचे स्वरूप, परीक्षा पद्धती, अभ्यासक्रम, विविध विषयांचे महत्त्व तसेच परीक्षेत यश मिळविण्यासाठी आवश्यक अभ्यासपद्धती आणि नियोजन याविषयी सविस्तर माहिती दिली.

स्पर्धा परीक्षेची तयारी करताना सातत्यपूर्ण अभ्यास, वेळेचे योग्य नियोजन, मूलभूत संकल्पनांची स्पष्टता, मागील वर्षांच्या प्रश्नपत्रिकांचा सराव आणि नियमित चाचण्या अत्यंत महत्त्वाच्या असल्याचे शिंदे यांनी सांगितले. विद्यार्थ्यांनी सुरुवातीपासून नियोजनबद्ध तयारी केल्यास राष्ट्रीय स्तरावरील परीक्षांमध्ये चांगले यश मिळिवता येऊ शकते, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. व्ही. माने यांनी बी. फार्मसीनंतर उपलब्ध असलेल्या विविध करिअर संधींची माहिती दिली. उच्च शिक्षण



आणि उत्तम करिअरच्या दृष्टीने जीपॅट परीक्षेचे महत्त्व स्पष्ट करताना त्यांनी यापूर्वी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी प्राध्यापकांच्या मार्गदर्शनाखाली सातत्यपूर्ण व कठोर परिश्रमाच्या जोरावर मिळिवलेल्या यशाची उदाहरणे दिली.

मार्गदर्शन सत्रामुळे विद्यार्थ्यांना जीपॅट व नायपर परीक्षेच्या तयारीची दिशा, अभ्यासाचे नियोजन आणि यशासाठी आवश्यक रणनीती याबाबत उपयुक्त माहिती मिळाली. राष्ट्रीय स्तरावरील प्रवेश परीक्षांविषयी विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता निर्माण करण्याबरोबरच उच्च शिक्षणासाठी त्यांना प्रोत्साहन मिळाले.

कार्यक्रमाचे आयोजन फार्मसी विभागप्रमुख डॉ. प्रीती माने आणि जीपॅट समन्वयक प्रा. ए. आय. काझी यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. कार्यक्रमाचे समन्वयन प्रा. आर. एस. हिंगमिरे, प्रा. डी. बी. भोजने आणि प्रा. पी. डी. गायकवाड यांनी केले.

# अणदूरमध्ये जनावरे शेतात सोडण्यावरून दोन गटांत हाणामारी, परस्परविरोधी गुन्हे दाखल

### लोखंडी रॉड, कुऱ्हाड आणि दगडाने मारहाणीच्या तक्रारी

**नळदुर्ग :** अणदूर (ता. तुळजापूर) येथे शेतात जनावरे सोडण्याच्या कारणावरून दोन गटात हाणामारी झाल्याची घटना सोमवारी (दि. ८) सकाळी सातच्या सुमारास घडली. या प्रकरणात दोन्ही गटांनी एकमेकांविरुद्ध नळदुर्ग पोलीस ठाण्यात फिर्याद दिली असून, पोलिसांनी परस्परविरोधी गुन्हे दाखल केले आहेत.

पोलिसांच्या माहितीनुसार, अणदूर शिवारातील पडीक शेत गट क्रमांक १५७/३/२ येथे ही घटना घडली. भरत विलास घोडके (वय ३५) यांनी दिलेल्या फिर्यादीत, शेतातून जनावरे काढण्यास सांगितल्याच्या कारणावरून निळकंठ लक्ष्मण घोडके, ओंकार निळकंठ घोडके, समर्थ निळकंठ घोडके, शिवाजी लक्ष्मण घोडके, लक्ष्मण निलाप्पा घोडके, लक्ष्मी निळकंठ घोडके, सत्यभामा शिवाजी घोडके व रेखाबाई लक्ष्मण घोडके यांनी गैरकायद्याची मंडळी जमवून शिवीगाळ केली. तसेच लाथाबुक्क्यांनी, लोखंडी रॉड व कुऱ्हाडीने मारहाण करून जखमी केले आणि जीवे मारण्याची धमकी दिल्याचा आरोप केला आहे.

तर दुसऱ्या गटातील निळकंठ लक्ष्मण घोडके (वय ४४) यांनीही याच घटनेप्रकरणी फिर्याद दिली आहे. त्यांच्या फिर्यादीनुसार, 'जनावरे शेतात का सोडली?' या कारणावरून प्रविण प्रकाश घोडके, भरत विलास घोडके, सतिश विलास घोडके, लता प्रकाश घोडके, श्रीदेवी सतिश घोडके आणि विलास बिरु घोडके यांनी गैरकायद्याची मंडळी जमवून शिवीगाळ केली. तसेच लाथाबुक्क्यांनी व दगडाने मारहाण करून जखमी केले आणि जीवे मारण्याची धमकी दिल्याचा आरोप करण्यात आला आहे.

दोन्ही गटांच्या फिर्यादी ८ सप्टेंबर रोजी नळदुर्ग पोलीस ठाण्यात नोंदविण्यात आल्या. त्यानुसार भारतीय न्याय संहितेच्या कलम ११८(१), ११५(२), ३५२, ३५१(२), १८९(२), १९० व १९१(२) अन्वये परस्परविरोधी गुन्हे दाखल करण्यात आले असून, पुढील तपास नळदुर्ग पोलीस करीत आहेत.

दैनिक तेरणा वृत्तांत
हे पत्र मालक, प्रकाशक व संपादक मल्हार राणाजगजितसिंह पाटील यांचे करिता प्रसाद संजय पवार, राजस्व प्रिंटिंग प्रेस, बुधवार पेठ, वडार गल्ली, सोलापूर, जि.सोलापूर ४१३००२ येथे मुद्रित केले व नरसिंह मंदिराजवळ, तेर, धाराशिव, महाराष्ट्र - ४१३५०९ येथे प्रकाशित केले. संपर्कासाठी : मो. ९९७५६५०३६३, इमेल - ternavruttant@gmail.com

Printed by Prasad Sanjay Pawar at Rajswa Printing Press, Budhwar Peth, Wadar Galli, Solapur, Dist. Solapur 413002, for the owner, publisher and editor Malhar Ranajagjitsingh Patil, published at Ter, near Narsingh Temple, Dharashiv, Maharashtra – 413509. RNI No. – MHMAR/25/A0338.

# बार्शीच्या नीलेश सरवदे केली ‘बीआरएम १००० किमी’ मोहीम फत्ते!

## सात जणांनी केला १ हजार किलोमीटर सायकलिंगचा टप्पा पूर्ण



ओंकार हिंगमिरे
बार्शी प्रतिनिधी

**बार्शी : व्यवसायातील व्यस्तता सांभाळत प्रबळ इच्छाशक्ती, कठोर सराव आणि अफाट सहनशक्तीच्या बळावर बार्शीतील कपडे व्यापारी नीलेश सरवदे यांनी तब्बल एक हजार किलोमीटरची ‘बीआरएम १००० किमी’ सायकलिंग मोहीम अवघ्या ७३ तास ५५ मिनिटांत पूर्ण केली आहे. या मोहिमेसाठी ७५ तासांची निर्धारित वेळ असताना त्यांनी तीन तास आधीच अंतिम टप्पा गाठत बार्शीच्या क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरीची नोंद केली.**

फ्रान्सच्या ऑडॅक्स क्लबच्या मान्यतेने आणि पहिल्यांदाच बार्शी सायकलिंग क्लबच्या वतीने आयोजित या मोहिमेची सुरुवात बार्शीतील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यापासून झाली. बार्शी–सोलापूर–तुळजापूर–बीड–अंबड आणि परतीच्या प्रवासात सोलापूर–टेंभुर्णी–थेऊर फाटा–टेंभुर्णी–बार्शी असा अत्यंत खडतर मार्ग सायकलपटूंनी आत्मविश्वासाच्या बळावर पार केला.

### ‘बीआरएम १०००’चे सात विजयी सायकलपटू

| अ.क्र. | सायकलपटू | ठिकाण | वेळ |
|---|---|---|---|
| 1 | राहुल कुंभार | सोलापूर | 65 तास 12 मिनिटे |
| 2 | प्रकाश गिरी | सोलापूर | 72 तास 45 मिनिटे |
| 3 | सचिन ठाकूर | पुणे | 72 तास 50 मिनिटे |
| 4 | नीलेश सरवदे | बार्शी | 73 तास 55 मिनिटे |
| 5 | नागमलेश्वर राव | पुणे | 73 तास 55 मिनिटे |
| 6 | पुनीत कुमार | मुंबई | 73 तास 55 मिनिटे |
| 7 | प्रकाश गावडे | मुंबई | 73 तास 55 मिनिटे |

या मार्गावर पाच हजार मीटरपेक्षा अधिक चढाई होती. त्यातच प्रचंड ऊन, अवघड चढ, बदलते हवामान, शारीरिक थकवा आणि झोपेचा अभाव अशा अनेक अडथळ्यांचा सामना करत नीलेश यांनी त्यांची मानसिकता खंबीर राखली आणि ७३ तास ५५ मिनिटे सायकल चालवून एक हजार किलोमीटरचे अंतर यशस्वीपणे पूर्ण केले.




या मोहिमेत सहभागी सायकलपटूंना गेवराई, टेंभुर्णी आणि बार्शी येथील नियंत्रण केंद्रांवर निर्धारित वेळेत पोहोचणे बंधनकारक होते. प्रवासादरम्यान विश्रांती, झोप, खाणे–पिणे, सायकलची देखभाल आणि वेळेचे नियोजन या सर्व बाबी प्रत्येक सायकलपटूला स्वतःच सांभाळाव्या लागतात. त्यामुळे ही मोहीम केवळ वेगाची नसून, शारीरिक क्षमता, मानसिक कणखरपणा आणि स्वयंशिस्तीची कठोर परीक्षा मानली जाते. ‘बीआरएम १०००’साठी १३ सायकलपटूंनी नोंदणी केली होती. त्यापैकी तीन जणांनी मोहिमेला सुरुवात केली नाही, तर तीन जणांना प्रवासादरम्यान मोहीम सोडावी लागली. प्रतिकूल परिस्थितीचा सामना करत सात सायकलपटूंनी ही मोहीम यशस्वीपणे पूर्ण केली. राहुल कुंभार यांनी ६५ तासांत, तर नीलेश सरवदे यांनी ७३ तास ५५मिनिट अंतिम टप्पा गाठला. नीलेश यांच्या या उल्लेखनीय कामगिरीबद्दल बार्शी सायकलिंग क्लबकडून अभिनंदन करण्यात आले असून, बार्शीतील क्रीडाप्रेमी आणि व्यापारी वर्गातूनही त्यांच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे.

> “एक हजार किलोमीटरचा प्रवास पूर्ण करताना प्रत्येक टप्प्यावर शारीरिक आणि मानसिक क्षमतेचा कस लागला. मात्र सातत्यपूर्ण सराव, आत्मविश्वास आणि बार्शी सायकलिंग क्लबच्या सहकार्यामुळे हे आव्हान पूर्ण करता आले.”
> – **नीलेश सरवदे,** बार्शीचे सायकलपटू




# ग्रामीण भागातील अवैध दारूविक्री बंद करा; अन्यथा एसपी कार्यालयावर मोर्चा

### रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (डेमोक्रॅटिक) पक्षाचा इशारा



**धाराशिव :** तुळजापूर तालुक्यातील कार्ला, उंडरगाव, सलगरा, तोरंबा आणि खंडाळा परिसरात हातभट्टी, देशी व विदेशी दारूची अवैध विक्री सुरू असल्याचा आरोप करत ती तातडीने बंद करण्याची मागणी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (डेमोक्रॅटिक) पक्षाने केली आहे. याबाबत जिल्हा पोलीस अधीक्षकांना निवेदन देण्यात आले.

ढाबे, टपऱ्या व विविध ठिकाणी विनापरवाना दारूविक्री होत असल्याने तरुण पिढी व्यसनाच्या आहारी जात असल्याचे निवेदनात म्हटले आहे. या प्रकारांची सखोल चौकशी करून कारवाई करावी; अन्यथा महिनाभरात पोलीस अधीक्षक कार्यालयावर मोर्चा काढण्यात येईल, असा इशारा देण्यात आला. निवेदनावर जिल्हाप्रमुख राज धज, महिला जिल्हाध्यक्षा बालिकाताई सूर्यवंशी, युवक प्रमुख अनिल वाघमारे, अल्पसंख्याक प्रमुख हाफीज धालुज यांच्यासह पदाधिकारी व ग्रामस्थांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# सीना नदीपात्रात एकाला रॉड–काठीने मारहाण; तिघांविरुद्ध परंडा पोलिसांत गुन्हा

**परंडा :** तालुक्यातील भोत्रा येथे एका व्यक्तीला रस्त्यात अडवून लोखंडी रॉड व काठीने मारहाण करत त्याच्या शर्टच्या खिशातील पैसे हिसकावून घेतल्याची घटना ७ सप्टेंबर रोजी रात्री साडेआठच्या सुमारास सीना नदीपात्रात घडली. याप्रकरणी परंडा पोलिस ठाण्यात तिघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अजिनाथ सोमनाथ शेळके (वय ४६, रा. भोत्रा, ता. परंडा) यांना स्वप्निल किसन पाटील, शुभम किसन पाटील आणि किसन बब्रुवान पाटील (सर्व रा. भोत्रा) यांनी रस्त्यात अडवले. ‘मागे मला शिव्या का दिल्या?’ या कारणावरून त्यांच्याशी वाद घालत शिवीगाळ केली. त्यानंतर लाथाबुक्क्यांसह लोखंडी रॉड व काठीने मारहाण करून जखमी केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.

यावेळी शेळके यांना जिवे मारण्याची धमकी देत त्यांच्या शर्टच्या खिशातील ९ हजार ३०० रुपये हिसकावून घेतल्याचाही आरोप आहे. अजिनाथ शेळके यांनी ८ सप्टेंबर रोजी दिलेल्या फिर्यादीवरून परंडा पोलिस ठाण्यात भारतीय न्याय संहितेच्या कलम ११९, १२६, ११८(१), ११५(२), ३५२, ३५१(२), ३(५) अन्वये गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

# पीसीपीएनडीटी कायद्याची काटेकोर अंमलबजावणी करा : न्या.भाग्यश्री पाटील

### तुळजापुरात जिल्हास्तरीय कार्यशाळा; लिंग गुणोत्तर सुधारण्यासाठी यंत्रणांच्या समन्वयावर भर

**धाराशिव :** मुलगी जन्माला येण्याआधीच तिच्या अस्तित्वावर प्रश्नचिन्ह निर्माण होऊ नये, यासाठी गर्भलिंग निदान आणि लिंग निवडीला प्रतिबंध करणाऱ्या पीसीपीएनडीटी कायद्याची काटेकोर व प्रभावी अंमलबजावणी आवश्यक आहे. जिल्ह्यातील लिंग गुणोत्तरात अपेक्षित सुधारणा घडवून आणण्यासाठी आरोग्य यंत्रणा, वैद्यकीय व्यावसायिक आणि संबंधित सर्व घटकांनी समन्वयाने काम करावे, असे आवाहन जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या सचिव न्या. भाग्यश्री पाटील यांनी केले.

८ सप्टेंबर रोजी तुळजापूर येथील टाटा सामाजिक संस्था येथे पीसीपीएनडीटी, एमटीपी व सरोगसी कायदा तसेच लिंग गुणोत्तर या विषयावर आयोजित जिल्हास्तरीय कार्यशाळेचे उद्घाटन पाटील यांच्या हस्ते दीप प्रज्वलनाने झाले. यावेळी त्या बोलत होत्या.

न्या. पाटील पुढे म्हणाल्या की, मुलींच्या जन्मदरात होत असलेली घट ही केवळ आकडेवारीतील बाब नसून सामाजिकदृष्ट्या गंभीर आणि चिंताजनक विषय आहे. त्याचे दूरगामी परिणाम समाजाच्या लोकसंख्यात्मक समतोलावर होऊ शकतात. त्यामुळे मुलींच्या जन्माला प्रोत्साहन देणे, लिंग निवडीला प्रतिबंध करणे आणि याविषयी समाजात व्यापक जनजागृती निर्माण करणे आवश्यक आहे. पीसीपीएनडीटी कायद्यान्वये नोंदणीकृत सोनोग्राफी केंद्रांनी कायद्यातील सर्व विहित तरतुदींचे काटेकोर पालन करावे. आवश्यक अभिलेख व नोंदी अद्ययावत ठेवण्याबरोबरच विहित नमुन्यातील कागदपत्रांची पूर्तता आणि संबंधित कायदेशीर प्रक्रियेचे पालन करणेही आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.




**कायद्यापासून ऑनलाइन नोंदणीपर्यंत मार्गदर्शन**

कार्यशाळेत सोलापूर येथील डॉ. माणिक गुर्रम यांनी पीसीपीएनडीटी कायद्यातील विविध तरतुदी,त्याची प्रभावी अंमलबजावणी, सोनोग्राफी केंद्रांची नोंदणी तसेच आवश्यक अभिलेख व नोंदींच्या देखभालीबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. सोनोग्राफी व एमटीपी केंद्रांच्या ऑनलाइन नोंदणी प्रक्रियेत येणाऱ्या अडचणी, आवश्यक कागदपत्रे आणि अभिलेख अद्ययावत ठेवण्याबाबतही त्यांनी माहिती दिली. छत्रपती संभाजीनगर येथील डॉ. हर्षलता लड्डा यांनी सरोगसी कायदा, त्यातील प्रमुख तरतुदी तसेच त्यासंबंधीच्या वैद्यकीय आणि कायदेशीर बाबींची माहिती दिली.

जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. धनंजय चाकूरकर यांनी प्रास्ताविकातून जिल्ह्यातील सोनोग्राफी केंद्रे, पीसीपीएनडीटी कायद्याची अंमलबजावणी आणि जिल्ह्यातील लिंग गुणोत्तर सुधारण्यासाठी करण्यात येत असलेल्या विविध उपाययोजनांची माहिती दिली. गर्भलिंग निदानास प्रतिबंध करण्याच्या दृष्टीने राबविण्यात येणाऱ्या खबरी योजनेबाबतही त्यांनी माहिती दिली.

कार्यशाळेला जिल्ह्यातील नोंदणीकृत सोनोग्राफी केंद्र संचालक, एमटीपी केंद्रधारक, स्त्रीरोगतज्ज्ञ, उपजिल्हा व स्त्री रुग्णालये तसेच ग्रामीण रुग्णालयांचे वैद्यकीय अधीक्षक, तालुका आरोग्य अधिकारी आणि संबंधित अधिकारी–कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. धनंजय चाकूरकर, आयुर्वेदिक महाविद्यालयाच्या अधिष्ठाता डॉ. वीणा पाटील, जिल्हा सरकारी अभियोक्ता ॲड. महेंद्र देशमुख, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. शिवाजी फुलारी, जिल्हा माता व बालसंगोपन अधिकारी डॉ. कुलदीप मिटकरी, डॉ.अनिल चव्हाण, पीसीपीएनडीटी नोडल अधिकारी डॉ. दत्तात्रय खुणे आणि अमर सपकाळ आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रमाकांत जोशी यांनी केले, तर डॉ. दत्तात्रय खुणे यांनी आभार मानले. कार्यशाळेच्या यशस्वी आयोजनासाठी डॉ. विक्रांत राठोड, शिवाजी साळुंखे, राहुल निरणे, शरद नाईकनवरे, उमेश गोरे, प्रदीप तटाळे, गोरोबा खांडेकर आणि श्रीनिवास निर्मल आदींनी सहकार्य केले.

**मुलींच्या जन्माचे स्वागत ही सामूहिक जबाबदारी**

मुलगा – मुलगी हा भेद न करता प्रत्येक मुलीला जन्माचा समान अधिकार आणि सन्मान मिळणे ही केवळ कायद्याची अपेक्षा नसून समाजाचीही सामूहिक जबाबदारी आहे. पीसीपीएनडीटीसारख्या कायद्यांची प्रभावी अंमलबजावणी, वैद्यकीय क्षेत्राचे जबाबदार सहकार्य आणि समाजातील मानसिकतेत सकारात्मक बदल या तिन्हींची सांगड घातल्यास लिंग गुणोत्तरातील असमतोल दूर करण्याच्या प्रयत्नांना अधिक बळ मिळू शकते.

# उमरगा तहसीलदारांची खुर्ची पेटवली ; मराठा आंदोलक आक्रमक

**उमरगा : मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे पाटील यांचे अंतरवली सराटी येथे उपोषण सुरू असतानाच धाराशिव जिल्ह्यात आंदोलनाला आक्रमक वळण लागले आहे. जरांगे पाटलांच्या समर्थनार्थ बुधवारी (दि. ९) सकाळी काही मराठा आंदोलकांनी उमरगा तहसील कार्यालयात घुसून तहसीलदारांच्या दालनातील खुर्ची बाहेर आणली आणि ज्वलनशील पदार्थ टाकून ती पेटवून दिली. अचानक घडलेल्या या प्रकारामुळे तहसील कार्यालय परिसरात काही काळ खळबळ उडाली.**

बुधवारी सकाळी दहाच्या सुमारास तहसील कार्यालयाचे कामकाज सुरू असताना काही आंदोलक मराठा आरक्षणाच्या मागणीसह मनोज जरांगे यांच्या समर्थनार्थ आणि शासनाच्या विरोधात घोषणाबाजी करत कार्यालयात दाखल झाले. आंदोलक थेट तहसीलदारांच्या दालनात शिरले. यावेळी शिपायाने त्यांना रोखण्याचा प्रयत्न केला; मात्र आंदोलकांनी त्याला बाजूला सारून तहसीलदारांची खुर्ची दालनातून बाहेर आणली.

त्यानंतर तहसील कार्यालयाच्या आवारात जोरदार घोषणाबाजी करत आंदोलकांनी खुर्चीवर ज्वलनशील पदार्थ टाकून ती पेटवून दिली. या घटनेमुळे कार्यालयातील अधिकारी, कर्मचारी आणि कामानिमित्त आलेल्या नागरिकांमध्ये काही काळ गोंधळाचे वातावरण निर्माण झाले.

घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तातडीने तहसील कार्यालयात धाव घेतली. घटनास्थळावरून अण्णासाहेब पवार, महादेव माने, विठ्ठल पवार (तिघेही रा. नाईचाकूर, ता. उमरगा) आणि वैजीनाथ काळे (रा. माडज, ता. उमरगा) या चार आंदोलकांना ताब्यात घेण्यात आले. पुढील कारवाईसाठी त्यांना पोलीस ठाण्यात नेण्यात आले.



# तेरणा अभियांत्रिकीच्या मेकॅनिकल विभागात शिक्षक दिन उत्साहात

## विद्यार्थ्यांकडून शिक्षकांप्रती कृतज्ञता; ‘एम पावर’ मासिकाचे प्रकाशन

**धाराशिव : तेरणा अभियांत्रिकी महाविद्यालयातील मेकॅनिकल इंजिनिअरिंग विभागाच्या वतीने शिक्षक दिन मंगळवारी (दि. ८ सप्टेंबर) उत्साहपूर्ण आणि प्रेरणादायी वातावरणात साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांनी कार्यक्रमाचे नियोजन करत शिक्षकांप्रती आदर आणि कृतज्ञता व्यक्त केली. यावेळी मेकॅनिकल विभागाच्या वतीने सातत्याने प्रकाशित करण्यात येणाऱ्या ‘एम पावर’ या मासिकाचे मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले.**



कार्यक्रमास महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विक्रमसिंह माने, मेकॅनिकल इंजिनिअरिंग विभागप्रमुख तथा अकॅडमिक डीन डॉ. डी. डी. दाते, प्रा. ए. झेड. पटेल, डॉ. पी. एस. कोल्हे, डॉ. उषा वडणे, प्रा. एस. ए. गायकवाड, प्रा. सुनीता गुंजाळ, प्रा. डी. एस. निंबाळकर, प्रा. आर. एस. टेकाळे तसेच तेरणा रेडिओचे स्टेशन डायरेक्टर संजय मैंदर्गी यांची प्रमुख उपस्थिती होती.

प्राचार्य डॉ. विक्रमसिंह माने यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना केवळ पदवी मिळिवण्यापुरते शिक्षण मर्यादित न ठेवता ज्ञान, कौशल्य, शिस्त, नैतिक मूल्ये आणि सामाजिक बांधिलकी जोपासण्याचे आवाहन केले. बदलत्या तंत्रज्ञानाच्या युगात विद्यार्थ्यांनी सातत्याने नवीन ज्ञान आत्मसात करून स्वतःला अद्ययावत ठेवणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

विभागप्रमुख तथा अकॅडमिक डीन डॉ. डी. डी. दाते म्हणाले, ‘अभियांत्रिकी क्षेत्रात सातत्याने बदल होत आहेत. सध्या उद्योग क्षेत्रामध्ये मेकॅनिकल इंजिनिअरिंगला वाढती मागणी आहे. या संधींचा विद्यार्थ्यांना लाभ घेता यावा, यासाठी विविध कौशल्याधारित उपक्रम महाविद्यालयात सातत्याने राबविले जात आहेत. विद्यार्थ्यांनी या उपक्रमांचा जास्तीत जास्त फायदा घ्यावा.’

यावेळी मान्यवरांनी शिक्षक दिनाचे महत्त्व, शिक्षणाची भूमिका, विद्यार्थ्यांनी आत्मसात करावयाची मूल्ये, तांत्रिक शिक्षणातील बदलत्या संधी आणि भविष्यातील करिअरच्या विविध वाटांबाबत मार्गदर्शन केले.

कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त करत शिक्षकांच्या योगदानाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. शिक्षक हा केवळ ज्ञान देणारा नसून विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाला दिशा देणारा शिल्पकार असल्याची भावना विद्यार्थ्यांनी व्यक्त केली.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी मेकॅनिकल इंजिनिअरिंग विभागातील शिक्षक, कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी विशेष परिश्रम घेतले. उत्साहपूर्ण व शिस्तबद्ध वातावरणात कार्यक्रमाची सांगता झाली.

# ऊस गाळप हंगाम १५ ऑक्टोबर २०२६ पासून सुरू करण्यास मान्यता

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखालील मंत्री समितीच्या बैठकीत निर्णय



मुंबई : ऊस गाळप हंगामाचे सन २०२६-२७ बाबत धोरण निश्चित करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली सह्याद्री अतिथीगृह येथे मंत्री समितीची बैठक झाली. या बैठकीत यंदाचा ऊस गाळप हंगाम १५ ऑक्टोबर २०२६ पासून सुरू करण्यास मान्यता देण्यात आली.

या बैठकीला उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, कृषिमंत्री दत्तात्रय भरणे, जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील, मुख्य सचिव राजेश अग्रवाल, मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव लोकेश चंद्र, मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव डॉ. श्रीकर परदेशी, सहकार विभागाचे प्रधान सचिव प्रवीण दराडे, साखर आयुक्त डॉ. संजय कोलते यांच्यासह संबंधित विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

राज्यातील ऊस उपलब्धता, गाळपाचे नियोजन, साखर उत्पादन, शेतकऱ्यांना मिळणारा ऊसदर तसेच साखर कारखान्यांसमोरील विविध आर्थिक व तांत्रिक बाबींचा बैठकीत सविस्तर आढावा घेऊन शेतकरी आणि साखर उद्योगाच्या हिताचा समतोल साधून आगामी गाळप हंगामाचे नियोजन करण्याबाबत चर्चा करण्यात आली.

२०२५-२६ गाळप हंगामाचा आढावा, देशातील साखर साठा, थकीत एफआरपी व आरआरसी, सहवीज निर्मिती प्रकल्प, इथेनॉल पुरवठा, ऊस क्षेत्र व उत्पादन, साखर निर्मिती तसेच २०२६-२७ च्या गाळप हंगामाची पूर्वतयारी,हंगामनिहाय एफआरपी व एमएसपी, साखर उद्योगाशी संबंधित शासनाच्या विविध उपक्रमांसाठी कारखान्यांकडून करण्यात येणाऱ्या कपातीचे धोरण आणि गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार कल्याण मंडळाच्या निधी कपातीचा आढावा,प्रलंबित देणी भागविण्यासाठी सॉफ्ट लोन योजनेवरील व्याज अनुदान सुरू करणे, ज्या साखर कारखान्यांचे सहवीज निर्मिती प्रकल्पांशी संबंधित वीज खरेदी करार संपुष्टात आले आहेत, अशा कारखान्यांना २०२३-२४ च्या हंगामाप्रमाणे प्रति युनिट १.५० रुपये सबसिडी देणे, साखर पॅकिंगसाठी ज्युट बॅगची सक्तीची अट शिथिल करणे, सीबीजी निर्मिती प्रकल्पांना आर्थिक व तांत्रिक प्रोत्साहन देणे, ऊस उत्पादन वाढीसाठी विशेष ऊस विकास योजना, ऊस उत्पादक शेतकऱ्यांचे उत्पादन आणि उत्पादकता वाढविण्यासाठी सुधारित ऊस वाण, रोपवाटिका, ऊस बेणे प्रक्रिया, ठिबक सिंचन, रासायनिक व सेंद्रिय खतांचा संतुलित वापर, आधुनिक ऊस लागवड पद्धती आणि यांत्रिकीकरण यांना प्रोत्साहन देण्यासाठी विशेष ऊस विकास योजना लागू करण्याबाबत सहकार विभागाचे प्रधान सचिव प्रवीण दराडे यांनी बैठकीत सादरीकरण केले.

# परंडा तालुक्यात तेरणा हॉस्पिटलचे मोफत आरोग्य शिबीर

### मुंबईतील तज्ज्ञ डॉक्टरांकडून ग्रामस्थांची तपासणी; गंभीर रुग्णांवर नेरूळ येथे मोफत उपचार





**परंडा :** ग्रामीण भागातील नागरिकांना दर्जेदार आरोग्यसेवा गावाजवळच आणि म ोफत उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने परंडा तालुक्यातील लोहारा येथे तेरणा स्पेशालिटी हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटर, नेरूळ, नवी मुंबई यांच्या वतीने मोफत आरोग्य तपासणी व उपचार शिबिराचे आयोजन करण्यात आले. येथील हनुमान मंदिरात झालेल्या या शिबिराला ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

शिबिरासाठी मुंबई येथील विविध आजारांवरील तज्ज्ञ डॉक्टरांचे पथक उपस्थित होते. डॉक्टरांनी नागरिकांची आरोग्य तपासणी करून आजारांनुसार आवश्यक वैद्यकीय सल्ला, उपचारपद्धती तसेच औषधोपचाराबाबत मार्गदर्शन केले. गावातच तज्ज्ञ डॉक्टरांकडून तपासणीची सुविधा उपलब्ध झाल्याने ग्रामस्थांनी सम ाधान व्यक्त केले.

तपासणीदरम्यान गंभीर स्वरूपाच्या आजारांचे निदान झालेल्या रुग्णांना पुढील उपचारांसाठी तेरणा स्पेशालिटी हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटर, नेरूळ, नवी मुंबई येथे निःशुल्क वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. त्यामुळे आर्थिक परिस्थितीमुळे मोठ्या शहरांमध्ये उपचार घेणे शक्य नसलेल्या गरजू रुग्णांना या उपक्रमाचा मोठा आधार मिळणार आहे.

यावेळी धनाजी शिंदे, नामदेव शिंदे, रूपेश गव्हाणे, योगेश डांगे, दशरथ दबडे, नितीन शिंदे, समर्थ ठांगे, शौर्य शिंदे, धनाजी दबडे, तानाजी दबडे यांच्यासह गावातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ‘मांजर’च्या कथेबद्दलचं गूढ उलगडणार १८ सप्टेंबरला

**मुंबई : आगामी मराठी चित्रपट मांजरचे पोस्टर प्रसिद्ध झाल्यापासूनच या चित्रपटाचे नाव प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेत आहे. त्यानंतर प्रदर्शित झालेल्या टीझरमधूनही ‘मांजर’च्या नावाम ागचं रहस्य कायम ठेवण्यात आलं आहे. या चित्रपटाच्या कथेशी मांजराचा किंवा मांजर या शब्दाचा नेमका काय संबंध आहे, याचं उत्तर मिळेल अशी अपेक्षा असतानाच आता ‘मांजर’च्या ट्रेलरने हा प्रश्न आणखीनच गुंतागुंतीचा केला आहे.**

ट्रेलरमध्ये चार मित्रांच्या आयुष्यात एका मागोमाग एक घडणाऱ्या भन्नाट प्रसंगांमुळे अक्षरशः उलथापालथ होताना दिसत आहे. एखादी गोष्ट सुरळीत करण्याचा प्रयत्न केला की ती आणखी बिघडते आणि त्यातून नवा किस्सा तयार होतो. या सगळ्या प्रसंगांमध्ये निर्माण होणारा विनोद, पात्रांची धावपळ आणि एकमेकांना सावरण्याच्या नादात वाढत जाणारा गोंधळ यामुळे हा चित्रपट फॅमिली एंटरटेनर आहे हे नक्की!

सिद्धार्थ मेनन, ओंकार भोजने, तेजस राऊत आणि भाग्यश्री लिमये यांच्या व्यक्तिरेखांमधून या गमतीजमतींचा केंद्रबिंदू असलेली कथा उलगडत जाते. त्यांच्या स्वभावाचे विविध कंगोरे आणि एकत्र आल्यानंतर निर्माण होणाऱ्या परिस्थितीमुळे प्रत्येक प्रसंगाला वेगळीच गंमत निर्माण होते. त्यांच्यासोबत ज्येष्ठ अभिनेते सयाजी शिंदे, अंशुमन विचारे, वैष्णवी आंधळे आणि अश्विनी काळसेकर यांच्याही



भूमिका कथेत रंगत आणताना दिसतात. प्रत्येक पात्र या गोष्टीत काही ना काही भर घालत असल्याने पुढच्या क्षणी काय होणार, याचा अंदाज बांधणं कठीण होतं.

मात्र, ट्रेलरमध्येही एक प्रश्न कायम अनुत्तरित राहातो, तो म्हणजे मांजराचा या सगळ्या गोष्टींशी नेमका संबंध काय? ट्रेलरच्या शेवटी ‘पिक्चरचं नाव ‘मांजर’ जरी असलं ना, तरी तिच्याशी माझा काहीसंबंधः’ हा संवाद ऐकू येतो आणि ट्रेलर संपतो आणि त्यानंतर ऐकू येतो तो मांजराचा आवाज. त्यामुळे ‘मांजर’चा या सगळ्या गोंधळाशी काही संबंध आहे की नाही, की या नावामागे आणखी काही भन्नाट ट्विस्ट दडला आहे, हे जाणून घेण्याची उत्सुकता आता आणखी वाढली आहे. दिग्दर्शक सुशील महादेव म्हणाले, ‘मांजर हा चित्रपट प्रेक्षकांना मनापासून हस-वणारा आणि त्याची कथा शेवटपर्यंत गुंतवून ठेवणारी आहे. पडद्यावर घडणाऱ्या गमतीजमतींचा आनंद घेताना प्रेक्षकांनी स्वतःलाही या प्रवासाचा एक भाग समजावं, हीच आमची इच्छा आहे. हा चित्रपट फॅमिली एंटरटेनर असल्याने प्रेक्षकांनी हा चित्रपट आपल्या कुटुंबासोबत पाहावा.’ एचथ्रीओ मोशन पिक्चर्स आणि जस्ट राईट फिल्म्स प्रस्तुत ‘मांजर’ या चित्रपटाचं दिग्दर्शन सुशील महादेव यांनी केलं आहे. सिद्धार्थ मेनन, ओंकार भोजने, तेजस राऊत, भाग्यश्री लिमये, सयाजी शिंदे, अंशुमन विचारे, वैष्णवी आंधळे आणि अश्विनी काळसेकर अशी तगडी स्टारकास्ट यात पाहायला मिळणार आहे. हर्ष, अविनाश शर्मा, हरि राजपूत, बंटी नागी आणि जसबीर नागी यांनी चित्रपटाची निर्मिती केली आहे. ए.ए. फिल्म्सकडून चित्रपटाचं वितरण करण्यात येणार असून, मांजर येत्या १८ सप्टेंबर रोजी सर्वत्र प्रदर्शित होणार आहे.